उपआयुक्त (सामान्य प्रशासन)कार्यालय
पुणे महानगरपालिका
ठराव क्रमांक आ/६१
दिनांक २८/०५/२०२१

उपआयुक्त (सामान्य प्रशासन)कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.उआ(साप्र)/आस्था/९६७९
दिनांक २८/०५/२०२१

**-आदेश-**

विषय:- सेवेत असताना मयत झालेल्या सेवकांच्या वारसास अनुकंपा तत्वाने मनपा सेवेत घेणेबाबत.

संदर्भ:- १.शासन निर्णय क्र. अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ,दि.२१/९/२०१७
२.मा. अति.महा.आयुक्त (ज.) ठ.क्र. १/१२४,दि.१९/०५/२०२१.

मनपा सेवेत असताना सेवक मयत झाल्यास अशा सेवकांच्या कुटुंबियाचे हाल होवू नयेत म्हणून त्यांच्या वारसास काही अटींवर सेवानिवड समिती या कक्षेतून वगळून अग्रक्रमाने मनपा सेवेत अनुकंपा तत्वावर घेणेबाबतचे धोरण मनपा प्रशासनाने स्विकारलेले असून ह्या बाबत मे.शासनाकडून प्रस्तुत करण्यात आलेल्या अटी व शर्ती नुसार नेमणूक देण्याची कार्यवाही केली जाते. याबाबत संदर्भ क्र.१अन्वये अद्यायावत शासन निर्णय प्रस्तुत करण्यात आला आहे.

खालील उमेदवार हे सेवेत असताना मयत झालेल्या सेवकांचे वारस आहेत.त्यांची 'बिगारी' (पे. बॅंड रु. ४४४०-७४४०+ग्रेड पे १३००+मान्य भत्ते) या हुद्याच्या शेड्युल मान्य रिकाम्या जागेवर नेमणूक करणेस संदर्भ क्र.२ अन्वये मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांची मान्यता प्राप्त झालेली आहे.

वारस नेमणुकीबाबत खालील दर्शविल्याप्रमाणे बिगारी या त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या वेतन श्रेणीत (पे.बॅंड रु. ४४४०-७४४०+ग्रेड पे १३००+मान्य भत्ते) आदेशाचे दिनांकापासून अगर प्रत्यक्ष हजर होतील त्या दिनांकापासून शेड्युलमान्य रिकाम्या जागेवर हंगामी नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सेवकाचे नाव व पत्ता | हुद्दा | तपशील |
|---|---|---|---|
| १. | श्री.अतिशेष संजय पारिटे (खुला) ८०९ शुक्रवार पेठ नेहरु चौक पुणे-०२  | बिगारी खाते- महापालिका आयुक्त कार्यालय | पुणे महानगरपालिकेच्या मुख्य अभियंता पाणीपुरवठा कार्यालयाकडील सेवक कै.संजय रामचंद्र पारिटे हुद्दा:असि इलेक्ट्रिशियन यांचे दि.२४/०९/२०१९ रोजी सेवेत असताना निधन झाले आहे. त्यांची कायदेशीर वारस मुलगा श्री.अतिशेष संजय पारिटे यांची अनुकंपा तत्वावर बिगारी (पे.बॅन्ड रु.४४४०-७४४०+ ग्रेड पे १३०० + मान्य भत्ते) या हुद्द्यावर शेड्युल मान्य रिक्त जागी हंगामी नेमणूक मान्य. |

प्रशासन अधिकारी
आस्थापना विभाग
पुणे महानगरपालिका

१)वरील उमेदवारांना नेमणूकीचे जागी रुजू करुन घेण्यापूर्वी त्यांचे शैक्षणिक पात्रतेचे मूळ दाखले, जन्म दिनांकाबाबतचे दाखले, जातीचे दाखले संबंधित मा. खातेप्रमुख यांनी पाहून ते बरोबर असल्याचे खात्री करुन घ्यावी. जन्मदिनांकाबाबत जन्म नोंदीतील उतारा/दाखला हजर करणे आवश्यक आहे. जर उमेदवाराकडे अशाप्रकारे दाखला उपलब्ध नसेल, तर त्या बाबतीत शाळा सोडल्याचा दाखला/शालांत परीक्षा प्रमाणपत्र यामध्ये नमूद केलेली जन्मतारीख ग्राह्य धरण्यात येईल. परंतु अशा उमेदवाराची भविष्यात जन्मतारीख बदलण्याची विनंती मान्य करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

२)वरीलप्रमाणे मनपामध्ये नेमणूक होत असलेले उमेदवार अन्य ठिकाणी (खाजगी) नोकरी करीत असतील तर त्यांनी तेथील नोकरीतून कोणत्याही स्वरुपाचा दोष न ठेवता त्यांना मुक्त करण्यात आले असल्याचा स्पष्ट उल्लेख असलेला दाखला (डिसचार्ज सर्टिफिकेट) मनपा सेवेत रुजू होताना नेमणूक खात्याकडे सादर करणे आवश्यक आहे. असा दाखला असल्याखेरीज त्यांना पुणे मनपा सेवेत रुजू करुन घेता येणार नाही. अन्य ठिकाणी यापूर्वी नोकरी करीत नसेल तर असा दाखला (डिसचार्ज सर्टिफिकेट) सादर करता येणार नाही. असे प्रतिज्ञापत्र दाखल करणे आवश्यक आहे.

३)वरील उमेदवाराने नेमणूकीचे खात्यात हजर होणेपूर्वी खात्याच्या प्रमुखांकडून मा. आरोग्य प्रमुख, पुणे मनपा यांचे नावे शारीरिक तपासणी करुन घेणेबाबतचे पत्र घेऊन, शारीरिक तपासणी करुन घ्यावी व शारीरिक पात्रतेचा दाखला प्राप्त करुन घ्यावा. असा दाखला असल्याशिवाय वरील उमेदवारास कामावर हजर करुन घेणेत येऊ नये, याची जबाबदारी खात्यावर राहील.

४)वरील उमेदवारास मनपा सेवेचा राजीनामा द्यावयाचा झाल्यास, त्यासाठी त्याने एक महिन्याची लेखी पूर्वसूचना देणे जरुरीचे आहे. पूर्वसूचना न देता राजीनामा दिल्यास, एक महिन्याच्या मुदतीपेक्षा राजीनाम्याची मुदत जितक्या दिवसांनी कमी असेल तितक्या दिवसांच्या वेतनाची रक्कम त्यांचेकडून वसूल करण्यात येईल, अशी समज खात्याने त्यांना द्यावी व समज मिळाल्याबद्दल त्यांची आज्ञापत्रावर स्वाक्षरी घेण्यात यावी.

५)वरील नेमणूक पूर्णपणे हंगामी स्वरुपाची असून उमेदवाराची नेमणूक सेवानियम १०(अ) नुसार परिविक्षाधिन आहे. परिविक्षा कालावधीमध्ये वरील उमेदवारांचे काम, वर्तणूक व उपस्थिती समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास त्यास कोणतीही कारणे अगर पूर्वसूचना न देता त्यांची पुणे मनपाकडील सेवा तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल.

६)महाराष्ट्र नागरी सेवा(ज्येष्ठतेचे विनियमन) निमय १९८२, मधील तरतुदीनुसार सरळसेवेने नियुक्तीकरीता तसेचपदोन्नतीने नियुक्तीकरिता प्राप्त झालेल्या विभागीय संवर्ग वाटपानुसार, संबंधित उमेदवाराने तसेच संबंधित शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांनी त्यांच्या नियुक्तीचे आदेश निघाल्याच्या तारखेपासून नियुक्तीच्या पदावर १ महिन्याच्या आत हजर होणे बंधनकारक आहे, त्यानुसार वरील उमेदवार हे १ महिन्याच्या आत कामावर हजर न झाल्यास त्यांची नेमणूक रद्द करण्यात येईल.

७)महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना-अ उमेदवारांनी नेमणूकीचे खात्याकडे रुजू होताना भरुन देणे बंधनकारक आहे. त्याशिवाय उमेदवारास संबंधित खात्याने हजर करुन घेवू नये. (महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही-२०००/प्रक्र १७ /२००१/१२, दिनांक ०१/०७/२००५).

८)महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक : चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ, दि. २८/०८/२०१७ अन्वये वारस उमेदवाराकडून सुधारित सांक्षाकिंत फॉर्म घेवून व चारित्र्य पडताळणी दाखला आज्ञापत्रकाचे दिनांकानंतर २ महिन्याचे आत सादर करण्याच्या अटीस अधीन राहून तात्पुरते आज्ञापत्र प्रसृत करण्याची तरतुद आहे तथापि सदर उमेदवाराचे पोलिस यंत्रणेकडील चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र दि.२४/११/२०२० अन्वये प्राप्त झाले आहे.

९)महाराष्ट्र शासन निर्णय क्र. अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ नुसार उपरोक्त सेवकांना निवृत्ती वेतन अनुदेय राहणार नाही. त्यांना निवृत्तीवेतन ऐवजी पारिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात येईल. निवृत्ती वेतन अंशदान प्रत्येक सेवकाला त्याचे नेमणूक दिनांकापासून भरणे आवश्यक राहील व त्याबाबतचे महाराष्ट्र शासनाने तयार केलेले नियम लागू राहतील.

१०)वरील उमेदवाराकडून आवश्यक तेवढी सेवा अनामत/सिक्युरिटी अनामत रक्कम त्यांनी नोकरी स्विकारणेपूर्वी घेणेबाबतची तजविज संबंधित मा. खातेप्रमुखांनी करावी.

११)मनपा सेवाविनियम व सेवावर्तणूक नियमांचे पालन करणेबाबतच्या जरुर त्या सूचना संबंधित मा. खातेप्रमुख यांनी वरील उमेदवारांना देण्याची तजविज करावी.

१२)वरील उमेदवार हे कामावर रुजू होताच त्याप्रमाणे जरुर ते निवेदन संबंधित मा. खातेप्रमुख यांनी आमचे कार्यालयाकडे सादर करावे.

१३)वरील उमेदवार पुणे मनपाच्या अधिनस्त कोणत्याही कार्यालयात बदली योग्य राहील.

१४)वरील उमेदवार यांनी नेमणुकीचे संदर्भात जात, शैक्षणिक पात्रता,जन्म दिनांक, अनुभव इ.बाबत सादर केलेली माहिती केव्हाही असत्य आढळुन आल्यास त्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता सेवेतुन कमी करण्यात येईल.

१५)मा. संबंधीत खातेप्रमुख यांनी सदर आज्ञापत्रात नमूद केलेल्या बाबींची वरील उमेदवारास समज देवून त्याची समज मिळाल्याबाबत आज्ञापत्राचे एका प्रतीवर स्वाक्षरी घ्यावी व त्याप्रमाणे आस्थापना विभाग कार्यालयाकडे निवेदन पाठवावे.

१६) मे. शासन निर्णय क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब दिनांक १२ डिसेंबर २०११, अन्वये वरील आज्ञापत्रामधील ज्या सेवकांची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षीत असलेल्या जागेवर झाली आहे अशा सेवकांची त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती करण्यात आली आहे.

ज्या सेवकांची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षीत असलेल्या जागेवर झाली आहे अशा सेवकांनी नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ (सहा) महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता सादर करणे बंधनकारक आहे.

मागासवर्गीय सेवकांनी नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधित जात वैधता समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेली पोचपावतीची साक्षांकित प्रत सेवकवर्ग विभाग कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर संबंधीत सेवकाचे नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येतील.

१७)सदर उमेदवारांच्या नेमणूका मे. शासनाच्या मार्गदर्शनाच्या अधिन राहून करण्यात येत आहेत.

१८)वरील सेवकांस मनपा सेवाविनियमानुसार वेतन व भत्ते आदा करण्यात यावेत.

या आज्ञापत्रातील उपरोक्त सर्व अटी/शर्ती संबंधित उमेदवारांवर बंधनकारक राहतील.

तरी, संबंधित मा. खातेप्रमुख यांनी जरूर ती पुढील तजविज करावी.

(सुनिल इंदलकर)
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

प्रत:-

१.मा.खातेप्रमुख/प्रशासन अधिकारी पुणे मनपा, यांजकडे माहितीसाठी व पुढील तजविजीसाठी रवाना.

२.वरील उमेदवार- श्री.अतिशेष संजय पारिटे

पुणे महानगरपालिका

(प्रकाश मोहिते)
प्र.प्रशासन अधिकारी(आस्थापना)
पुणे महानगरपालिका.